मातृभूमि

# सायबर क्राईम बाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन शिबीर संपन्न

## खंडेलवाल विद्यालयातील मुलींनी केले मार्गदर्शन




।पारस, दि. १०।

वाढती गुन्हेगारी लक्षात घेता व वाढता सोशल मीडियाचा वापर लक्षात घेता आपण ऑनलाइन फसवणुकीला बळी पडत आहोत .तसेच आपण सोशल मीडियावर आपले जे वैयक्तिक फोटो माहिती शेअर करतो तिचा सुद्धा गैरवापर होताना मोठ्या प्रमाणात दिसत आहे.

त्यासोबतच ऑनलाइन फ्रॉड कॉल बँक मधून ऑटोमॅटिक गायब होणारी रक्कम कशाप्रकारे फ्रौड करून काढल्या जाते. तसेच विद्यार्थी लहान वयापासून मोबाईल मुळे वेडी झालेली आहेत एक प्रकारचं महाभयंकर लागलेला मोबाईलचा व्यसन सोडवण्यासाठी आज शाळेमध्ये सायबर क्राईम बाबत मार्गदर्शन शिबिर आयोजित करण्यात आले होते. मार्गदर्शन करण्यासाठी खंडेलवाल विद्यालय अकोला येथील प्रणाली पिंपळकर व शितल साखरे यांनी विद्यार्थ्यांना सखोल असे मार्गदर्शन केले.

यावेळी शाळेचे मुख्याध्यापक मनोज लांडे, सहाय्यक शिक्षक निलेश सातव, शिवाजी पंडितकर, सय्यद असलम, राजेश दिवनाले, टिळक भारंबे, हेमंत उपरीकर, वर्षा होनाळे,सुहासिनी उबाळे, तृप्ती घाटोळ, रेशमा चांभारे, प्रिया लांडे, वैष्णवी लांडे, दिपाली दळी, सूचिता वानखडे, कल्याणी बकाल, रोशनी टेकाडे,जयमाला बोडखे, सोनाली भाकरे, रेखा नाही नैताम, प्रियंका हागे, कोमल तायडे, रेखा भरणे, पूजा कराळे, शुभांगी लोड, फरहीन बानू, वैष्णवी टेकाडे, प्राची राऊत, तर शालेय कर्मचारी करुणा खंडारे, शोभा साठे, श्रीराम साठे, उपस्थित होते. कार्यक्रमाची संचालन रेखा भरणे यांनी तर आभार प्रदर्शन प्राची राऊत यांनी केले.